महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचे कार्यालय
कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४
दूरध्वनी क्र.२७५७१५१७/२७५७८००३, फॅक्स् क्र.२७५७१५१६,
ई-मेल: rbkonkan@gmail.com / konkandcr@gmail.com

---

जा.क्र./ल. ले/कां.स/ 07 /सन 2023-24
फोर्ट, मुंबई – 400 001 दिनांक:-12.7.23

प्रति,

**मा. अपर मुख्य सचिव, (महसूल)**
**मंत्रालय, मुंबई.**

**विषय :** कांदळवन व पाणथळ समितीच्या संबंधाने विविध अडचणी बाबत बैठक आयोजित करणेबाबत.

**संदर्भ :** 1. मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. 87/2006 दि.17.09.2018 रोजीचा न्यायनिर्णय.
2. मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र.87/2013 वनशक्ती पब्लीक ट्रस्ट व इतर मधील दिनांक 25 जुलै, 2016 रोजीचे अंतरिम आदेश.
3. कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या दि.30.06.2023 रोजीच्या 22 व्या बैठकीतील निर्देश.

**महोदय,**

कांदळवन संवर्धन व संरक्षण करणेकरिता मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र. 87 / 2006 च्या निर्देशानूसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती गठित करण्यात आलेली आहे. तसेच, मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानूसार या सनियंत्रण समितीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरावरील समिती गठित झालेली आहे.

विषयांकित प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अंतिम आदेशाच्या अनुषंगाने शासकीय जमीनीवरील कांदळवन आच्छादित क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत स्पष्ट आदेश दिलेले आहेत. या अनुषंगाने विभागीय समितीच्या आजपर्यंत 22 बैठका झालेल्या असून, उक्त विषयावर बैठकीत वारंवार चर्चा करण्यात आलेली आहे.

परंतु अद्यापि या संदर्भात सर्व संबंधित यंत्रणांकडून कांदळवन क्षेत्र हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण झालेली नाही. विभागीय समितीचे कामकाज पार पाडताना कांदळवन क्षेत्र हस्तांतरणाबरोबरच कांदळवन क्षेत्रातील डेब्रिज हटवून मुळ स्थितीत पुर्न:स्थापना करणे, समितीच्या कामकाजाकरीता स्वतंत्र कक्ष निर्माण करणे इत्यादी विषयांबाबत धोरणात्मक निर्णय होणेकरीता सर्व संबंधित विभागांची संयुक्त बैठक आपले अध्यक्षतेखाली होणे आवश्यक आहे.

तरी, वरील विषयांकित प्रकरणी संयुक्त बैठक आयोजित करणेकरिता दिनांक व वेळ मिळण्यास विनंती आहे.

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
अध्यक्ष
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग**

**प्रतिलिपी :-** 1. सह अध्यक्ष, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना माहितीसाठी.
2. सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.